फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३३७/२०१८
निशाणी ५ खाली आदेश

## आदेश

**सी.एन.आर.नंबर एम.एच.पी.यु.१८–००१४०८–२०१८**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने तिच्या पति विरुध्द महिलांचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ चे (यापुढे संक्षिप्त रित्या 'सदर कायदा' असे संबोधण्यात येत आहे) कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

### अर्जदाराचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे

२. अर्जदार यांनी जाबदेणार यांचे विरूध्द कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ चे कलम १२ प्रमाणे अर्ज केला आहे. अर्जदारावर घरगुती जुलूम परत होवु नये म्हणुन जाबदेणार विरुध्द प्रतिबंधात्मक मनाई करण्यात यावी. जाबदेणारांनी अर्जदार हिस कोणत्याही प्रकारे संपर्क साधुन व सार्वजनिक ठिकाणी जाणेयेणेस हरकत अडथळा करु नये अगर जुलुम होईल असे कोणतेही कृत्य करु नये. म्हणुन जाबदेणर विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करुन त्यांच्या विरुध्द प्रतिबंधात्मक कारवाईचे तुर्तातुर्त आदेश पारित करण्यात यावेत व तसे अंमलबजावणीचे आदेश संरक्षण अधिकारी यांना देण्यात यावेत.

३. अर्जदाराच्या माहेरी भाऊ, बहीण व आई–वडील असे राहण्यास असुन त्यांचे दोन खोल्यांचे घर आहे. आई–वडील व भावाच्या सोबत छोटाशा घरात राहणे शक्य नसल्याने अर्जदार नं. १ व २ यांना तिच्या माहेरी भाड्याने राहण्याकरिता स्वतंत्र व्यवस्था करावी त्याचे भाडेपोटी रक्कम रुपये ५०,०००/– जाबदेणार यांनी देण्याबाबत तुर्तातुर्त आदेश करावेत व राहण्यास हिल्ला हरकत करु नये. तसेच जाबदेणाराकडुन त्याबाबत बंधपत्र अथवा जामीनपत्र घेण्याचे आदेश व्हावेत. अर्जदार यांना सासरी नांदण्यास नाकारले म्हणुन अर्जदार यांना त्यांच्या माहेरी राहवे लागत आहे. तरी अर्जदार व मुलगी शिवकन्या

यांना पोटगी म्हणुन रक्कम तसेच अर्जदारास माहेरी राहत असताना अर्जदार व तिच्या मुलीच्या उदरनिर्वाहाकरिता व औषध उपचाराकरिता एकत्रितपणे तुर्तातुर्त रक्कम रुपये दरमहा १५,०००/– जाबदेणार यांनी दयावी.

४. महिलांचा घरगुती जुलमांपासुन रक्षण करण्यासंबंधीचा कायदा सन २००५ मधील कलम १८, १९, २० व २२ च्या संदर्भाने कलम २३ प्रमाणे तुर्तातुर्त आदेश पारित करण्यात यावेत. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात यावा. महिलांचा घरगुती जुलूमांपासुन रक्षण करण्यासंबंधीचा कायदा सन २००५ कलम २३ प्रमाणे कलम १८, १९, २० व २२ संदर्भाने तुर्तातुर्त आदेश पारित करण्यात यावेत न्यायाच्या दृष्टीने योग्य तो एकतर्फी तात्पुरते आदेश पारित करण्यात यावेत. संरक्षण अधिकारी सो. यांचे नियुक्ती होवुन मे. कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश व्हावेत.

**<u>जाबदेणारांचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे</u>**

५. जाबदेणार यांनी अर्जदारासोबत दिनांक ०८.१२.२०१६ रोजी विवाह केला आहे. अर्जदार यांनी जाबदेणारास कधीही समजुन घेतले नाही. अर्जदार यांनी जाबदेणार अथवा त्यांचे कुटूंबावर कधीही प्रेम केले नाही. अर्जदार या लहान गोष्टीवर सारखे रागात येत असत. अर्जदार हे जाबदेणार अथवा त्यांच्या घरच्यांसाठी स्वयंपाक करत नसत. अर्जदार हे सकाळी ०९.०० वाजता उठत असत. जाबदेणार यांचे घरातील काम हे अर्जदाराची सासु करत असत. अर्जदार हे तीन ते चार वेळा जाबदेणार यांचे संमती, माहिती व कोणत्याही कारणाशिवाय जाबदेणार यांचे घर सोडुन त्यांच्या माहेरी गेल्या होत्या. जाबदेणार हे अर्जदारास तु माहेरी न सांगता का गेली असे विचारले असता अर्जदार हे त्यांना 'ज्या वेळेस जायचे असेल त्यावेळेस मी जाणार' असे म्हणत असत. जाबदेणार हे अर्जदारास म्हणत असत की, ज्यावेळेस तुला माहेरी जायचे असेल त्यावेळेस किमान त्याची माहिती तरी आम्हाला देत जा. परंतु अर्जदार त्या गोष्टी ऐकण्यास तयार नसत.

६. काही महिन्यापुर्वी जेव्हा जाबेदणार क्र. १ हे बिल्डींगच्या खाली होते, तेव्हा अर्जदार हिने बेडरुम लॉक करुन घेवुन ओढणीच्या सहाय्याने फॅनला गळफास लावण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळेस जाबदेणार क्र. १ यांची आई ओरडल्यामुळे व तिने जाबदेणार क्र. १ यांना फोन केल्यामुळे जाबदेणार क्र. १ हे घरी येवुन त्यांनी बेडरुमचे दार तोडुन अर्जदाराचे प्राण वाचवले.

७. जाबदेणार हे त्यांच्या मुलीस विनाशर्थ सांभाळण्यास तयार आहेत. अर्जदाराचा भाऊ व अर्जदाराची आई हे अर्जदाराच्या संसारात एक नंतर एक असे ढवळाढवळ करत असत. ज्यावेळेस जाबदेणार हे अर्जदाराच्या वडीलास अर्जदारास समजावुन सांगण्यास सांगा असे म्हणाले असता अर्जदाराचे वडील हे जाबदेणारास म्हणाले की, 'बाहेरचा कचरा माझे घरी आणु नका' त्यावेळेस जाबदेणारास धक्का बसला. अर्जदार यांनी जाबदेणारास खुप त्रास दिला आहे. अर्जदाराने जाबदेणार व त्यांच्या घरच्यांना नेहमी अपमाणित केले आहे. जाबदेणार क्र. १ यांचे आई व वडील हे आजारी आहेत. दिनांक १७.०५.२०१८ रोजी अर्जदाराने जाबदेणार यांचे संमती व माहिती शिवाय त्यांचे घर सोडुन माहेरी गेले आहेत.

८. जाबदेणार हे अर्जदाराच्या घरी त्यांच्या मुलीस भेटण्यासाठी गेले तेव्हा अर्जदाराने जाबदेणार यांना त्यांच्या मुलीस भेटु दिले नाही. अर्जदार हे जाबदेणार यांचा फोन उचलत नसत आणि केव्हा जर उचलला तर अपमाणित भाषा वापरत असत. जाबदेणार यांनी अर्जदार यांना वैवाहिक जिवन संपुष्टात आणण्याबाबत घटस्फोट मिळण्यासाठी कायदेशीर नोटीस पाठवली होती. सदरची नोटीस ही अर्जदार यांना प्राप्त झालेली आहे. अर्जदार यांनी सदर नोटीशीस उत्तर पाठवुन बिनबुडाचे प्रत्यारोप केले आहेत. अर्जदार हे जाबदेणारवर त्यांचे इतर मुलीशी संबंध असल्याबाबत विनाकारण संशय घेत असत. अर्जदार यांनी एप्रिल २०१७ पासुन जाबदेणार यांचे सोबत कोणतेही शारिरीक संबंध ठेवले नाहीत. अर्जदार यांना चांगले व वाईट काय आहे हे कळत नाही. अर्जदार यांनी विनाकारण जाबदेणार यांचेविरुध्द सदरचे प्रकरण दाखल केल्यामुळे अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

## मान्य गोष्टी

९. १. अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह झाला आहे.

२. अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांना एक मुलगी आहे.

१०. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांच्यातर्फे त्यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. उभय पक्षांच्या वकिलांच्या युक्तिवादानंतर माझ्या विचाराधीन आलेले वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| अनुक्रमांक | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | जाबदेणार क्र. १ याने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी अर्जदाराने शाबित केले काय? | होय |
| २ | अर्जात मागितलेली अंतरिम पोटगी मिळण्यास अर्जदार पात्र आहेत काय? | अंशतः होय |
| ३ | काय आदेश? | अंतिम आदेशान्वये |

## कारणमिमांसा

## वादप्रश्न १ करिता

११. जाबेदणार यांनी त्यांच्या जबाबात नमुद केले आहे की, अर्जदार हे जाबदेणारास कधीही समजुन घेत नव्हते. परंतु जाबदेणार यांनी अर्जदार हे जाबदेणारास कोणत्या घटनेमध्ये व परिस्थीतीमध्ये समजुन घेत नव्हते या बाबतचा तपशील जाबदेणार यांनी संदर्भासहीत नमुद केल्याचे दिसुन येत नाही. त्यासोबतच जाबदेणार यांनी पुढे नमुद केले आहे की, अर्जदार या छोट्या छोट्या गोष्टीवर नेहमी रागात येत असे. परंतु जाबदेणार यांनी अर्जदार या कोणत्या गोष्टीवर व कधी रागात आल्या याबाबत त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमुद केल्याचे दिसुन येत नाही.

१२. जाबदेणार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमदु केले आहे की, अर्जदार ही तीन ते चार वेळेस जाबदेणार यांच्या संमती व माहिती शिवाय जाबदेणार यांचे घर सोडुन निघुन गेली होती. परंतु जाबदेणार यांनी त्या अनुषंगाने तारीख व वेळ हे म्हणण्यामध्ये नमदु केल्याचे दिसुन येत नाही. जाबदेणार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमदु केले आहे की, अर्जदार हिने फॅनला ओढणी लावुन गळफास घेण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्याबाबतीतही जाबदेणार यांनी तारीख व वार ही नमुद केली नाही. त्यासोबतच जाबदेणार यांनी त्या अनुषंगाने पुढे काय कार्यवाही केली याबाबतचा सविस्तर तपशील त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमदु केला नाही. जाबदेणार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमुद केले आहे की, अर्जदार ही जाबदेणार यांना लहानसहान गोष्टीवर घटस्फोट मागत असे. परंतु जाबदेणार यांनी त्याही अनुषंगाने सविस्तर असा तपशील त्यांच्या म्हणण्यामध्ये नमदु केला नाही.

१३. जाबदेणार यांनी त्यांच्या म्हणण्यामधे नमुद केले आहे की, जाबदेणार क्र. १ यांचे वडील हे अर्धांगवायु पासुन त्रस्त आहे. तसेच त्यांची आई ही सारखी आजारी असते. परंतु जाबदेणार यांनी त्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा हा अभिलेखावर दाखल केला नाही, त्यामुळे जाबदेणार यांच्या म्हणण्यास या क्षणी कागदपत्रांची जोड दिसुन येत नाही. जाबदेणार यांनी त्यांच्या जबाबामधील नमुद सर्व घटना या तारीख, वार व वेळेनिशी कथन केल्या नाहीत. त्यासोबतच त्या संबंधीचे सविस्तर असे स्पष्टीकरणही दिले नाही. त्यामुळे जाबदेणार यांच्या कथनास या क्षणी बळकटी दिसुन येत नाही.

१४. अर्जदार यांनी अर्जात नमुद केले आहे की, त्यांना सहा महिन्याची मुलगी असुन तिचे पालणपोषण हे अर्जदार हे करीत असुन जाबदेणार यांनी अर्जदारास कुठल्याही प्रकारची मदत न करता अर्जदार यांना मानसिक व शारिरीक त्रास दिला आहे. जाबदेणार यांचे म्हणणे पाहता त्यांनी या क्षणी अर्जदार हे त्यांच्यासोबत राहत असल्याचे कथन केले नाही. त्यासोबतच त्यांनी अर्जदार व त्यांच्या मुलीच्या उदरनिर्वाहाची सोय केल्याचेही दिसुन येत नाही. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने शपथपत्र दाखल

केलेले आहे. या क्षणी अर्जदारास उदरनिर्वाहाचे कोणतेही संयुक्तीक असे साधन दिसुन येत नाही. त्यामुळे एकंदर अर्ज व अर्जदाराचे शपथपत्र पाहता या क्षणी प्रथमदर्शनी अर्जदाराच्या कथनास बळकटी आल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे या क्षणी अर्जदाराचे कथन हे जाबदेणाराचे कथनापेक्षा सरस असे दिसुन येत आहे. त्यामुळे जाबदेणार यांनी अर्जदारा यांचा प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसुन येत आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे नोंदवीत आहे.

**मुददा क्र. २ करिता–**

१५. वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष पाहता अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. कोणत्याही स्त्रीचे लग्न झाल्यानंतर तिच्या निर्वाह भत्याची जबाबदारी तिच्या पतीवर असते. निर्वाह भत्ता हा या शब्दाची व्याख्या हिंदु दत्तक विधान व निर्वाह कायदा १९५६ चे कलम ३ (ब) मध्ये नमुद करण्यात आलेले आहे. निर्वाह भत्ता म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि औषधोपचार यासाठी करण्यात आलेली तरतुद होय. पत्नीच्या मुलभुत गरजा भागविणे ही प्रत्येक पतीची जबाबदारी आहे.

१६. अर्जदाराने अर्जात नमुद केले आहे की, जाबदेणार नं. १ हे एका नामांकित कंपनीस नोकरीस असुन त्यांना दरमहा ३५,०००/– ते ४०,००० रुपये उत्पन आहे. त्यासोबतच अर्जदार यांचे सासरे सरकारी नोकरीत होते व त्यांना ही पेन्शन मिळते. जाबदेणार यांचा स्वतःच्या मालकीचा फ्लॅट आहे. जाबदेणार यांना मोठे आर्थिक उत्पन्न मिळत असताना ही जाबदेणार यांनी अर्जदारास सासरी सांभाळण्यास नकार दिला आहे.

१७. अर्जदाराने अर्जात नमुद प्रमाणे जाबदेणार यांच्या उत्पन्नाविषयी निश्चीत असा कागदोपत्री पुरावा हा दाखल केला नाही. त्यामुळे अर्जदाराने जाबदेणार यांच्या उत्पन्ना विषयी कागदपत्रांची जोड ही दिली नाही. त्यामुळे अर्जदार यांच्या कथनानुसार जाबदेणारास उत्पन्न मिळते असे गृहीत धरता येणार नाही.

१८. प्रस्तुत प्रकरणामध्ये जाबदेणार यांनी निशाणी १८ ला पुरशीस दाखल करुन त्यात नमुद केले आहे की, जाबदेणार क्र. १ हे त्यांच्या मुलीस दरमहा दोन हजार रुपये आदेशाच्या तारखेपासुन देण्यास तयार आहेत.

१९. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जात व म्हणण्यामध्ये नमुद केलेले आरोप व प्रत्यारोप हे सिध्द होणे बाकी आहे. अर्जदारास या क्षणी उदरनिर्वाहाची अडचण दिसुन येत आहे. त्यामुळे अर्जदार यांना या क्षणी अंतरीम पोटगी देणे न्यायोचीत वाटते. त्यासोबतच पत्नी व मुलांना सांभाळण्याची जबाबदारी ही प्रत्येक पती व वडिलावर असते. तसेच ती केवळ कायदेशीर जबाबदारी नसुन नैतिकदृष्टया देखील जबाबदारी आहे. त्यामुळे एकंदर वरील सर्व बाबींचा विचार करता या घडीला अर्जदारास निर्वाह भत्ता देणे योग्य, न्याय व गरजेचे दिसुन येत आहे. त्यामुळे वर नमुद कारणांचा विचार करीता तसेच अर्जदाराच्या मुलभुत गरजा, त्यांचे राहणीमान, महागाई यांचा सांगोपांग विचार करीता अर्जदार क्र. १ व २ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये २०००/– एवढी अंतरीम पोटगी ही जाबदेणार क्र. १ याने देणे योग्य, न्याय व गरजेचे वाटत आहे. त्यासोबतच जाबदेणार यांनी अर्जदाराचा घरगुती जुलूम करु नये याबाबत अर्जदारास तुर्तातुर्त सुरक्षा आदेश देण्यात येत आहे.

## वादप्रश्न क्र. ३ करीता

२०. एकंदर वरील सर्व कारणांचा विचार करिता मी वादप्रश्न क्र.३ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मजुर करण्यात येत आहे.

२. जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ व २ यास प्रत्येकी रक्कम रुपये २०००/– प्रतिमहा अंतरिम पोटगी ही सदर अर्ज निशाणी ५ वरील अर्ज दाखल तारखेपासुन मुळ

अर्जाच्या अंतिम न्यायनिर्णयापर्यंत देण्याचे याव्दारे निर्देशित करण्यात येत आहे.

३. जाबदेणार यांनी अर्जदाराचा घरगुती जुलूम करु नये असा अर्जदारास तुर्तातुर्त सुरक्षा आदेश देण्यात येते आहे.

४. सदर आदेशाची प्रत अर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by Amitkumar Trimbakrao Mangire
Date: 2020.02.17 17:37:54 +0530

(अ.त्रिं.मनगिरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२)
दौंड, ता.–दौंड, जि.–पुणे

दिनांक १५.०२.२०२०

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same,word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Steno | :- R.R.Kshirsagar |
| Court | :- A.T.Mangire,<br>Judicial Magistrate F.C., Daund<br>(Court No.2) |
| Order date | :- 15/02/2020 |
| Order singed by the Presiding Officer on | :- 15/02/2020 |
| Order uploaded on | :- 17/02/2020 |